संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज..
# माणदेश एक्सप्रेस
संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com

एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर, आटपाडी
डॉ.सौ. चैताली समेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. समेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
उपलब्ध सुविधा
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे • • अंक : ११२ • • रविवार दि. १० मार्च २०२४ • • किंमत २ रु • पाने : ४ • RNI : MAHMAR/2017/77021

# बारामतीत सुप्रिया सुळेंच्या विजयाची तयारी

## शरद पवारांचा मास्टर स्ट्रोक; २५ वर्षांनी घेतली कट्टर विरोधकाची भेट

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: राजकारणातील कट्टर विरोधक असलेले शरद पवार आणि अनंतराव थोपटे यांची आज जवळपास २५ वर्षानंतर भेट झाली. आज शरद पवार यांच्या उपस्थितीत भोर येथे शेतकरी मेळावा पार पडत असून महविकास आघाडीचे सर्व नेते या सभेला संबोधित करणार आहेत. मात्र, मेळावा सुरू होण्याअगोदर शरद पवार आणि अनंतराव थोपटे यांची आमदार संग्राम थोपटे यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, आमदार संग्राम थोपटे उपस्थित होते. यावेळी शरद पवार यांनी अनंतराव थोपटे यांच्या तब्येतीची विचारपूस देखील केली.

शरद पवारांसोबत बाळासाहेब थोरात, माझी खासदार नाना नवले, महाराष्ट्र काँग्रेसचे उपाध्यक्ष देविदास भन्साळी उपस्थित होते. या भेटी दरम्यान थोपटे कुटुंबातील अनंतराव थोपटे, त्यांचे पुत्र संग्राम थोपटे, संग्राम थोपटे यांची पत्नी स्वरूपा थोपटे, संग्राम थोपटे यांचा मुलगा पृथ्वीराज थोपटे, संग्राम थोपटे यांची मुलगी तेजस्विनी थोपटेही यावेळी उपस्थित होते.

अनंतराव थोपटे हे भोर विधानसभेचे काँग्रेसचे विद्यमान आमदार संग्राम थोपटे यांचे वडील आहेत. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी अनंतराव थोपटे यांची भेट घेतली होती.

थोपटे घराणं पहिल्यापासून काँग्रेसशी एकनिष्ठ राहिले आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघातील भोर विधानसभेमध्ये येणाऱ्या भोर, वेल्हा, मुळशी या तीनही तालुक्यात थोपटे यांचं गेली तीन ते चार दशकं वर्चस्व राहिलं आहे. अनंतराव थोपटे हे ६ वेळा काँग्रेस पक्षाकडून विधानसभेवर आमदार म्हणून निवडून गेले आहेत. तर, त्यांचे पुत्र आणि भोर विधानसभा मतदारसंघांचे विद्यमान आमदार संग्राम थोपटे हे सलग ३ वेळा काँग्रेसकडून आमदार म्हणून निवडून आले आहेत.

अनंतराव थोपटे यांनी त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रासाठी मंत्रीपदही भूषवलं आहे, तर थोपटे हे मुख्यमंत्री पदाचे दावेदार असताना पवार यांनी त्यांच्या विरोधात राष्ट्रवादीचा उमेदवार देऊन थोपटे यांना पाडलं होतं. तेव्हापासून ते एकमेकांचे कट्टर विरोधक मानले जातात. तेव्हापासून पवार आणि थोपटे यांचं कधीच पटले नव्हतं. तर २०१९ नंतर नाना पटोले यांनी विधानसभा अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर अध्यक्ष पदासाठी संग्राम थोपटे यांचं नाव चर्चेत असताना राष्ट्रवादीतूनच त्यांना अंतर्गत विरोध पहायला मिळाला होता.

राष्ट्रवादीच्या फुटीनंतर पवारांसाठी आगामी निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे. बारामतीमधून पवार यांच्यासमोर अजित पवार यांच्या माध्यमातून तगडं आव्हान असणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आगामी लोकसभा निवडणुकांमध्ये मतांचं गणित जुळवण्यासाठी पवार राजकीय कार्यकिर्दीमध्ये कधीही न पटलेल्या व्यक्तीची भेट घेत असल्याचं बोललं जातं आहे.

# महायुतीतील जागावाटपाचा पेच कायम

## दोन दिवसांनी दिल्लीत पुन्हा बैठक



**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई: महायुतीच्या गोटातून जागावाटपासंदर्भात एक महत्त्वाची बातमी येत आहे. लोकसभेच्या जागावाटपावरु महायुतीतील तिढा अद्यापही कायम आहे. त्याबाबत दिल्लीत महायुतीची महत्त्वाची बैठक पार पडली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत जागावाटपावर कुठलाही तोडगा निघाला नसल्याची माहिती आहे. त्यामुळे पुन्हा दोन दिवसांनी महायुतीच्या नेत्यांची बैठक होणार आहे.

अमित शाहांच्या उपस्थितीत पुन्हा एकदा महाराष्ट्रातील महायुतीतील जागावाटपावर चर्चा होणार आहे. येत्या ११ मार्चला दिल्लीत ही बैठक पार पडणार आहे. या बैठकीत जागावाटपावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महायुतीतील शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला जास्तीत जास्त जागा मिळवायच्या आहेत. अमित शाहांच्या महाराष्ट्र दौऱ्यापूर्वी एकनाथ शिंदे गटाने २२ तर अजित पवार गटाने १६ जागांची मागणी केली होती. तर अमित शाहांच्या मुंबई भेटीनंतर एकनाथ शिंदे ११ आणि अजित पवार ५ जागांवर तयार होतील अशी चर्चा होती. दिल्लीत झालेली चर्चा अत्यंत सकारात्मक आहे. एकाच बैठकीत सगळे निर्णय होतील असं शक्य नाही. पण, ८० टक्के काम हे कालच्या बैठकीत झालं आहे. २० टक्के जे विषय राहिले आहेत ते एकमेकांशी चर्चा करुन लवकरच पूर्ण करु शकतो असा मला विश्वास आहे, असं राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

# 'वंदे भारत' एक्स्प्रेसला सांगली, मिरजेची ॲलर्जी; संपर्क क्रांती थांबाही नाकारला

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : देशभरात एकूण ८२ वंदे भारत एक्स्प्रेस ट्रॅकवरून धावत असताना सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांचीच या गाडीला लर्जी असल्याचे चित्र आहे. कर्नाटक राज्यातील महत्त्वाच्या मार्गांवरूनही ही रेल्वे धावत आहे. मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडून दुपदरीकरणाच्या कामाचे तांत्रिक कारण पुढे केले जात असले तरी कोकण मार्गावर असेच काम सुरू असतानाही वंदे भारत सुरू झाल्याने हे कारण तकलादू असल्याचे स्पष्ट झाले आहे. कोल्हापूर ते मुंबई मार्गावर वंदे भारत सुरु होणार असल्याची घोषणा काही महिन्यांपूर्वी रेल्वेने केली होती, मात्र तीही फसवी निघाली. सांगलीतील सामाजिक संघटना, प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. सोशल मीडियावर याबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

# उद्योग पळवले म्हणता, मग पाच लाख कोटींचे रोजगार आले नसते; मुख्यमंत्र्यांचा विरोधकांना टोला

## मुनावळेत कोयना जलपर्यटनाचा प्रारंभ; स्थानिकांना रोजगार उपलब्ध



**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा: सह्याद्रीच्या कुशीत निसर्गस्थळे लपली आहेत. त्याचा विकास करण्यासाठी इच्छाशक्ती हवी. कोयना जलपर्यटन प्रकल्पातून तर स्थानिकांना रोजगार मिळणार आहे. त्यामुळे भूमिपूत्रांना बाहेर नोकरीसाठी जावे लागणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर महाराष्ट्र उद्योगस्नेही राज्य आहे. उद्योग पळवले म्हणतात, मग राज्यात पाच लाख कोटींचे रोजगार आले नसते, असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला.

मुनावळे, ता. जावळी येथे कोयना जलाशयाच्या तीरावर महाराष्ट्र शासन पर्यटन विकास महामंडळाच्या कोयना जलपर्यटन प्रकल्पाचा शुभारंभ मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते. उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभूराज देसाई, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार मकरंद पाटील, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलिस अधीक्षक समीर शेख, एमटीडीसीच्या व्यवस्थापक शर्मा, जलसंपदा विभागाचे अरुण नाईक, जयंत शिंदे, महाराष्ट्र पर्यटन विकास प्रकल्पाचे सल्लागार सारंग कुलकर्णी, शिवसेना शिंदे गट जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, 'देशातील धरणातील पहिलाच जलक्रीडा प्रकल्प मुनावळे येथे होत आहे. अशी कामे होण्यासाठी इच्छाशक्ती लागते. या मातीतील मी सुपूत्र असल्याने मला सेवा करण्याची संधी मिळालेली आहे. कोयना धरणापासून मागे ४० किलोमीटरपर्यंत बॅकवॉटर आहे. पण, मुख्यमंत्री झाल्यापासून धरणाबाबतचा हा कायदाच काढून टाकला. त्यामुळेच हे पर्यटन केंद्र होत आहे. आता मासेमारीही होत आहे. येथील जलक्रीडा केंद्र तर २५ एकरमध्ये होणार आहे. पर्यावरणपूरक आणि पाण्याचे प्रदूषण न होता हा प्रकल्प होणार असल्याने यातून स्थानिकांनाही रोजगार मिळणार आहे. यामुळे येथून पुढे कोणी नोकरीसाठी बाहेर जाणार नाही. जे बाहेर गेले आहेत तेच आता माघारी आले पाहिजेत, असा उद्देश या प्रकल्पामागे आहे.

कोयना भागातच आपटी-तापोळा पूल तसेच रघुवीर घाटातून कोकणला जोडणारा घाटरस्ता होणार आहे. यामुळे कोकणचे ६-७ तासांचे अंतर दीड तासावर येणार आहे. त्यातच कोयना भागात विकासाच्या खूप संधी आहेत. त्याचा योग्य वापर झाला पाहिजे असे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आमचं सरकार सामान्यांचं, शेतकरी, कष्टकरी, महिला तसेच तरुणांचं आहे. या सरकारने विकासाचेच काम केले आहे. त्यामुळे पायाभूत विकासाबरोबरच परदेशी गुंतवणुकीतही राज्य प्रथम क्रमांकावर आहे. दावोसमध्ये ३ लाख ७३ हजार कोटींचे करार झाले. राज्यातील उद्योग दुसरीकडे गेले असते तर पाच लाख कोटींचे रोजगार आले नसते. आता कोयना परिसरातही उद्योगपती येतील. त्यांना सोयीसुविधा पुरावायला हव्यात.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस पर्यटन विकास विभागाच्या कोयना जल पर्यटन केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांच्यासह अन्य मान्यवरांनी काउंटरवर तिकीट खरेदी केले. तर या कार्यक्रमात स्थानिक तरुणांना प्रातिनिधीक स्वरूपात रोजगाराची नियुक्तीपत्रे देण्यात आली. तर मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह मंत्री आणि अधिकाऱ्यांनीही दरे ते मुनावळे हा येण्याजाण्याचा प्रवास बोटीने केला. यावेळी शिवसागर जलाशयात विविध बोटीच दिसून येत होत्या. या कार्यक्रमासाठी प्रांताधिकारी सुधाकर भोसले, सरपंच भोसले यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दत्ता (काका) पाटील यांचा सत्कार



**आटपाडी : दत्ता (काका) पाटील यांचा सत्कार करताना संपादक दिपक प्रक्षाळे, सचिन चव्हाण, वैजिनाथ घोंगडे व उपस्थित मान्यवर**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : मंगळवेढा तालुक्यातील गुंजेगाव येथील जेष्ठ नेते दत्ता (काका) पाटील यांनी दैनिक माणदेश एक्सप्रेस कार्यालयास भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

गुंजेगाव ता. मंगळवेढा येथील दत्ता (काका) पाटील हे सोमलिंग संस्थेच्या माध्यमातून विचिध क्षेत्रात कार्यकर्त आहेत. सोमलिंग संस्था ही जलसंसाधरण व जलजीवन मिशन योजने मध्ये काम करत असून संपूर्ण राज्यात संस्थेचे कामकाज चालते. तसेच जलसंसाधरण व जलजीवन मिशन कामाबाबत लोकांमध्य जनजागृती करत असून लोकांना याद्वारे ते प्रशिक्षित करण्यात येते.

आटपाडी येथे दैनिक माणदेश एक्सप्रेस कार्यालयास त्यांनी भेट दिली. यावेळी त्यांचा संपादक दीपक प्रक्षाळे यांच्या हस्ते शाल, फेटा बांधून सत्कार करण्यात आला. यावेळी 'परिक्रमा माणगंगेची' या पुस्तकाचे लेखक वैजिनाथ घोंगडे, माणदेश : स्वरूप आणि विकास या पुस्तकाचे लेखक प्रा.डॉ. कृष्णा इंगोले, सेवानिवृत्त वनअधिकारी माणिक भोसले, जल बिरादारीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष नरेंद्र चू, शाखा अभियंता श्री. शेख, गजानन बनकर, डॉ. सूर्यवंशी, सचिन चव्हाण, पाणी फौंडेशनचे राजेंद्र पाटील, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# फॅबटेक पॉलिटेक्निक मध्ये एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगोला : येथील फॅबटेक पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये नॉन डिस्ट्रक्टिव्ह टेस्टिंग या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. सिव्हिल विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेसाठी पंढरपूर येथील गोवर्धन कन्स्ट्रस्शनचे डायरेक्टर धुळाप्पा बोरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोरकर म्हणाले, बांधकामाच्या सुरुवातीस कच्च्या मालाचे टेस्टिंग व बांधकाम पूर्ण झाल्यावर त्याच्या गुणवत्तेचे टेस्टिंग गरजेचे असल्याचे सांगत, नॉन डिस्ट्रक्टिव्ह टेस्टिंग चे प्रात्यक्षिक करुन दाखवले.

या कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी प्रा.शरद पवार यांनी मोलाचे सहकार्य केले. ही कार्यशाळा संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब रुपनर, मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. अमित रुपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, संचालक डॉ. डि.एस. बाडकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.तानाजी बुरुंगले यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

# आटपाडी तालुक्यातील उर्वरीत शाळांनाही डिजीटल डिव्हाईस देणार : आम. गोपीचंद पडळकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यातील १८७ शाळांपैकी पहिल्या टप्प्यात ६७ जिल्हा परिषद शाळांना तब्बल अडीच कोटींचे डिजीटल इन्ट्रॅक्टीव डिव्हाईस दिले असून उर्वरीत शाळांचा दुसरा टप्पाही महिनाभरात पूर्ण करून सर्व जिल्हा परिषद शाळात शिकणाऱ्या सर्व मुलांना लाभ देण्याचे अभिवचन पंचायत समिती शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धा बक्षीस वितरण सोहळ्यात आमदार गोपीचंद पडळकर यांनी दिले. यावेळी आमदार पडळकर यांचा कृतज्ञता म्हणून तालुक्यातील सर्व शिक्षकांच्या वतीने शिक्षण विभागामार्फत यथोचित सन्मान करण्यात आला.



**आटपाडी : तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा प्रसंगी उपस्थित आमदार गोपीचंद पडळकर यांचा सत्कार करताना दत्तात्रय मोरे व मंचावर उपस्थित**

आटपाडी तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या क्रिडा स्पर्धा बक्षिस वितरण सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न झाला. यावेळी परसबाग स्पर्धा, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, शिक्षकांचे स्पर्धा परीक्षेतील यशस्वी पाल्य, आदींचाही सन्मान आमदार पडळकर यांच्या हस्ते करण्यात आला. स्वागत शिक्षण विस्तार अधिकारी जगन्नाथ कोळपे यांनी केले. प्रास्ताविकात शिक्षक बँकेचे माजी चेअरमन यु. टी. जाधव यांनी शिक्षकांसाठी शिक्षक भवनाची मागणी केली त्यास आमदारांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले.

गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय मोरे यांच्या हस्ते आमदार गोपीचंद पडळकर यांच्या सत्कार करण्यात आला. भाजपा युवक जिल्हाध्यक्ष अनिल पाटील, माजी सभापती जयवंत सरगर, शिक्षण विस्ताराधिकारी अशोक म्हेत्रे, जगन्नाथ कोळपे, सुरेश हसबे, शिक्षक बँक माजी चेअरमन यु.टी. जाधव, समाधान ऐवळे, संचालक शरद चव्हाण, सचिन खरमाटे, संचालक आजिनाथ बुधावले, तालुका शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन किरण सोहणी, नानासो झुरे, शिक्षक समिती तालुकाध्यक्ष संजय कबीर, शिक्षक संघ (शि.द.) गट तालुकाध्यक्ष यशवंत गोडसे, शिक्षक संघ (संभाजी थोरात) अध्यक्ष असिफ मुजावर, जुनी पेन्शन संघटना अध्यक्ष नितीन गळवे, जनार्दन मोटे, रावसाहेब देवडकर, युवा नेते चंद्रकांत दौंडे, चंद्रकांत काळे, शामराव ऐवळे, हैबतराव पावणे, दिपक कुंभार, श्रीरंग वायदंडे, प्रशांत चंदनशिवे, सचिन हेगडे, यांच्यासह सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व तालुक्यातील सर्व शिक्षक व बी.आर.सी. स्टाफ उपस्थित होते.

# कौठुळीत महिला दिन साजरा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यातील कौठुळी येथे महिला दिन साजरा करण्यात आला. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ग्रामसंघाकडुन आरोग्यविषयक माहिती देण्यात आली. महिलांना गृह उद्योगाबाबत माहिती व गृह उद्योगा बाबत कमीत व्याज दरात बचत गटातुन पैसे उपलब्ध करुण देवून, महिलांनी मोठ्या प्रमाणात घरगुती ऊद्योगधंदे उभे करावेत याची माहिती देण्यात आली.



**आटपाडी : कौठुळी येथे महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना उपस्थित महिला**

यावेळी ग्रामसंघाच्या सीआरपी अर्चना गेजगे, ग्रामसंघाच्या सर्व अध्यक्ष, सचिव सिमा लोहार, अश्विनी दिनेश कदम, रेखा कदम, पुनम कदम, काजल कदम, स्वाती कदम, निता कदम, अमृता कदम, सारीका कदम, वैशाली कदम, अनिता जाधव, उषा कदम, छाया कदम, चंदा सुतार, जया कदम व संघाच्या इतर सर्व महिला ऊपस्थित होत्या.

यावेळी अंबिका महिला समुह गटाच्या सचिव अश्विनी दिनेश कदम व काजल संदिप कदम यांचेकडुन महिलांना महाशिवरात्री निमित्त ऊपवासाचे वाटप करण्यात आला. यावेळी बँक सखी मंगल जाधव. सीटीसी दिपाली तळे यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

## * संपादकीय *

# नक्षलींचा 'निकाल'

दहशतवाद किंवा नक्षलवादासारखी हिंसक समस्या लोकभावना चेतवून सोडवता येत नाही. त्यासाठी कायद्याचे अधिष्ठान असलेली जबर राजकीय इच्छाशक्ती लागते. ती नसली तर न्यायाच्या कसोटीवर सरकारचे तोंडघशी पडणे हे ठरलेले. ते कसे हे जाणून घ्यायचे असेल तर जिज्ञासूंनी नक्षलवादाचा आरोप असलेले जी. एन. साईबाबा यांना निर्दोषत्व बहाल करताना दिलेले निकालपत्र जरूर वाचावे. याच साईबाबांना उच्च न्यायालयाच्या याच नागपूर खंडपीठानेही आधी निर्दोष सोडले होते. बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायद्यातील (यूएपीए) कलमे लावताना तपास यंत्रणांनी कायदेशीर तरतुदीचे पालन केले नाही हा तेव्हाच्या निकालाचा मुख्य आधार होता. इतक्या महत्त्वाच्या प्रकरणात केवळ तांत्रिक आधारावर आरोपीची सुटका करणे अयोग्य असा युक्तिवाद करून राज्य सरकारने त्या निकालाला तेव्हा तातडीने आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने त्याची दखल घेऊन हा खटला नव्या खंडपीठासमोर चालवून गुणवत्तेवर निकालात काढावा असे निर्देश दिले. या सव्यापसव्यानंतर आलेला हा निकाल तपास यंत्रणांची गुणवत्ता किती तकलादू आहे हे सविस्तरपणे दाखवून देतो. म्हणून त्याची चर्चा आवश्यक.


'पुराव्यांचे विश्लेषण केल्यावर आम्ही अशा निष्कर्षाला आलो आहोत की ही शिक्षा ग्राह्य नाही' इतक्या स्पष्ट शब्दांत हा निकाल आहे. पुराव्यांना पुरेसा आधार देण्याची प्रक्रिया तपास यंत्रणांनी पाळली नाही हा या निकालातील आक्षेप. पण तो केवळ तांत्रिक ठरू शकत नाही. त्यामुळे राज्य सरकार कोणत्या आधारावर फेरविचार मागणार हा प्रश्न अधिक गहिरा होतो. जे जे पुरावे तपास यंत्रणांनी दिले ते न्यायालयाने अमान्य केले. तसे करताना न्यायालयाने 'आरोपी माओवाद अथवा नक्षलवाद या विचारधारेचे समर्थक आहेत असा निष्कर्ष यातून जरूर निघू शकेल, पण केवळ समर्थक आहे म्हणून यूएपीए कायद्यातील कलमे आरोपीवर लावणे योग्य ठरवले जाऊ शकत नाही' असा स्पष्ट निर्वाळा दिला आहे. उल्लेखनीय म्हणजे असाच निर्णय न्यायालयाने याआधीसुद्धा नक्षलींच्या संदर्भातील अनेक प्रकरणांत दिला आहे. तरीही सरकार त्याच कायद्याचा आधार घेत अनेकांना गुन्ह्यात अडकवत असेल तर ते न्यायपूर्ण ठरते असे कसे म्हणायचे? या निकालातील दुसरा व महत्त्वाचा मुद्दा आहे तो इलेक्ट्रॉनिक पुराव्यांसंदर्भातला. विविध संकेतस्थळांवर व माहितीजालात नक्षली विचारधारेविषयी उपलब्ध असलेली माहिती केवळ डाऊनलोड केली हा गुन्हा ठरू शकत नाही. या विचारधारेशी संबंधित छायाचित्रे, चित्रफिती कुणीही बघू शकतो. त्याचा अभ्यासही करू शकतो. केवळ या कारणासाठी एखाद्याला गुन्ह्यात अडकवणे संविधानाच्या कलम १९ नुसार मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे असे स्पष्ट मत न्यायालय नोंदवते.

भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ८५ ब नुसार कोणताही इलेक्ट्रॉनिक पुरावा बनावट अथवा खोटेपणाने तयार केला गेलेला नाही असे न्यायालयांना प्रथमदर्शनी गृहीत धरावे लागते. जर या पुराव्याच्या अस्सलपणालाच आव्हान दिले गेले व ते सिद्ध झाले तरच हा पुरावा सरसकट नाकारला जातो. या प्रकरणात साईबाबांकडून हस्तगत केलेल्या इलेक्ट्रॉनिक पुराव्याची प्रत (मिरर इमेज) काढली कधी याबद्दल पोलिसांनी दिलेल्या साक्षीतच विसंगती दिसून आली. पण फक्त एवढ्यावर ते पुरावे बनावट असे न्यायालयाने मानले नाही. कोणते पुरावे आरोप सिद्ध करण्यासाठी पुरेसे ठरतात व कोणते नाही हे तपासण्याचे काम मात्र न्यायालयाने केले. यातून तपास यंत्रणांच्या एकंदर कामातील विसंगती ठळकपणे उघड झाली. नक्षली कारवायांचा कट रचण्यात साईबाबांसह एकूण पाचजणांचा सहभाग असल्याचे मानून या सर्वांवर यूएपीएची कलमे लावण्यात आली होती. भारतीय दंड विधानाच्या कलम १२० ब नुसार गुन्ह्याचा कट रचला म्हणून कमीतकमी दोन वर्षांची शिक्षा ठोठावता येते, पण यूएपीएत हा कट सिद्ध झाला तर कमीतकमी पाच वर्षे व जास्तीतजास्त जन्मठेपेची शिक्षा देता येते. साईबाबा प्रकरणात 'कट कोणता? कोणत्या कृतीसंदर्भातला कट?' हा कळीचा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. याचे उत्तरच तपास यंत्रणा वा सरकारी बाजूकडे नसताना यूएपीएची जाचक कलमे लावण्याची काही गरज नव्हती असे हा निकाल म्हणतो तेव्हा तपास यंत्रणा व त्याच्या पाठीशी असणाऱ्या सरकारच्या हेतूवर शंका घेण्यास वाव उरतो.

या निकालामुळे यूएपीएच्या गैरवापराचा मुद्दासुद्धा ठसठशीतपणे समोर आला आहे. हिंसेला प्राधान्य देणारा व संविधान न मानणारा नक्षलवाद वाईटच. त्याचे समर्थन कदापि करता येणार नाही. मात्र केवळ त्याचे वैचारिक समर्थन करणाऱ्यांना तुरुंगात डांबणे हा या समस्येवरचा उपाय नाही. अविभाजित आंध्र प्रदेशात एकेकाळी या चळवळीला भक्कम बौद्धिक पाठिंबा होता. अनेक विचारवंत व जनकवींनी नक्षलींकडून उपस्थित केल्या जाणाऱ्या मुद्द्यांचे व कधी कधी तर हिंसेचे समर्थन केले. त्या सर्वांना तुरुंगात डांबण्याचे धोरण तेथील सरकारने कधी अवलंबले नाही. जंगलातील सशस्त्र चळवळ थंडावली अथवा संपुष्टात आली की या विचारवंताच्या समर्थनाकडे कुणी लक्षही देणार नाही हे सरकारला ठाऊक होते. शिवाय पुराव्याच्या मुद्द्यावर अशा प्रकरणात न्यायपालिकेसमोर उघडे पडावे लागेल याची भीतीही होती. तेव्हाच्या सरकारने या बौद्धिक समर्थकांचा नक्षलींशी वाटाघाटी करण्यासाठी उपयोग करून घेतला. त्याचा फायदाही त्या राज्याला झाला व शस्त्र आणि संवादाच्या माध्यमातून ही चळवळ आटोक्यात आणण्यात त्यांना यश मिळाले. २०१४ नंतर देशात नेमके उलटे घडू लागले. जंगलातल्या सशस्त्र संघर्षावर लक्ष केंद्रित करण्याचे सोडून उजव्या विचाराच्या सरकारांनी त्यांचे पारंपरिक शत्रू अशी ओळख असलेल्या या डाव्या नक्षलीसमर्थकांना तुरुंगात धाडण्याचा सपाटा सुरू केला. तो कायद्याच्या कसोटीवर टिकणारा नाही हे अनेकांना दिसत होते. तरीही सरकार आडमुठेपणाने वागत राहिले. त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. उच्च न्यायालयाच्या पातळीवर निकाली निघालेले साईबाबा यांचे प्रकरण हे याच साखळीतले.

यातून ठळकपणे अधोरेखित होणारा आणखी एक मुद्दा म्हणजे सरकारांकडून होणाऱ्या कायद्याच्या गैरवापराचा. सध्या काळ्या पैशाबाबतचा पीएमएलए कायदा असो वा नक्षली व इतर अनेक प्रकरणांत सर्रास वापरला जाणारा यूएपीए हा कायदा असो, भारतीय दंड विधानातील १५३ अ हे दंगेखोरीबद्दलचे कलम असो अथवा २९५ अ हे धार्मिक भावना दुखावल्याबद्दलचे कलम असो, त्याचा वापर गेल्या दहा वर्षांत सतत वाढत गेला आहे. या सर्व खटल्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण नगण्य राहिले, पण विरोध करणाऱ्या अथवा विरोधी विचार जोपासणाऱ्यांना अशा गुन्ह्यात अडकवण्याची सरकारची भूक अजिबात कमी झाली नाही. खटले दीर्घकाळ प्रलंबित ठेवायचे. तोवर जामीन मिळू न देता आरोपी कोठडीत कसा राहील याकडे काटोकोरपणे लक्ष द्यायचे. यातून राजकीय फायदा उचलत राहायचे. त्याचा वापर सत्ता राखण्यासाठी करायचा. पण यासाठी सरकारने ज्या समस्येचा आधार घेतला तिचे काय? नक्षली अजूनही त्यांच्या प्रभावक्षेत्रात दबा धरून बसलेलेच आहेत. या खऱ्या नक्षलींचा 'निकाल' सरकार केव्हा लावणार? त्यातून घडणाऱ्या हिंसेचा जाच सहन करणाऱ्या निरपराध नागरिकांना दिलासा देण्याचे काम सरकारचे नाही तर आणखी कुणाचे? सरकारचा हा चुकलेला प्राधान्यक्रम कायद्याच्या राज्याकडे नाही तर अराजकतेच्या वाटेवर नेऊ शकतो हे लक्षात कधी येणार?

# ओपन-बुक परीक्षा सोपी असेल?




ओपन-बुक परीक्षा किंवा पुस्तकासहित परीक्षा घेण्याची घोषणा आधी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) केली आणि पाठोपाठ महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानेही (स्टेट बोर्डानेही) इयत्ता नववी ते बारावीसाठी लवकरच पुस्तकासहित परीक्षा योजना राबवणे विचाराधीन असल्याचे म्हटले आहे. पुस्तकासहित परीक्षा घेण्यामुळे मुले पाठ्यपुस्तक वाचतील हा सकारात्मक बदल नक्कीच घडेल पण केवळ वाचन उपयोगाचे नाही तर वाचलेलं जे जे आहे त्याचं आकलन झालं पाहिजे आणि आकलन झालं तरच त्या माहितीचं उपयोजन कुठे करायचं आणि कसं करायचं हे मुलांना समजेल.पुस्तका विरहित परीक्षा मुलांच्या बुद्धिमत्तेपेक्षा पाठांतर, घोकंपट्टी व आठवण्याची क्षमता याचा कस लावणारी होती. अभ्यास न करणाऱ्यांसाठी पण कॉपी करून पास होणाऱ्यांना वरदान होती. आता पुस्तकासहित परीक्षा घेण्याचा प्रायोगिक प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट असतील तर आणि विचारलेल्या प्रश्नांचे आकलन त्यांना झाले तर उत्तर त्यांच्या मनातच असेल. परीक्षेमध्ये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना वाचन केल्यानंतर व त्याचे आकलन झाल्यानंतर व उपयोजन करता आल्या नंतरच देता येऊ शकतील. आजच्या विद्यार्थ्यांमध्ये पाठांतर करण्याची क्षमता आहे पण त्याचे आकलन व उपयोजन यामध्ये ते कमी पडतात. परीक्षेत आतापर्यंत विद्यार्थी फक्त प्रश्नांची उत्तरे लिहीत होती, आता त्यांना एखाद्या प्रश्नाचे उपयोजन, विश्लेषण व त्यावर आपलं मत मांडता येणं आवश्यक ठरणार आहे. ज्याप्रमाणे वकिलांचा अभ्यास असेल तर कोणत्या पुस्तकात कोणत्या पानावर कोणतं कलम, कोणता नियम आहे हे त्यांना माहीत असतं, ते संदर्भ घेऊन ते केस लढवतात.

विद्यार्थी आज किंवा पाठ्यपुस्तकातून व शिक्षकांनी शिकवलेल्या भागावरच अवलंबून असतात असे नाही तर पुस्तकांच्या बाहेर जे जे आहे ते उदा. इंटरनेट विकिपीडिया, प्रसार माध्यमे यातून ते शिकत असतात. प्रत्येक पाठाच्या खाली आता योजना चे प्रश्न असतात पण ते सोडवताना विद्यार्थी किती आकलन उपयोजनाचा उपयोग करतो ते पाहणे महत्त्वाचे आहे. गृहपाठ कॉपी करून किंवा आई-वडिलांनी लेला असेल तर अशा प्रकारची मुले पुस्तके घेऊन सुद्धा उत्तरे शोधू शकणार नाहीत. मूक वाचन प्रकट वाचन बंद झालेल्या मुलांना पुस्तके कशी वाचायची त्यातील अर्थ समजून त्याचा इतर ठिकाणी कसा वापर करायचा या दिशेने यांची आधी तयारी करून घ्यावी लागेल. वाचन आकलन उपयोजन हे एकमेकांशी निगडित असल्यामुळे पुढचे सर्व त्यांना कसे येईल.

आजची मुले पाठ्यपुस्तके फार कमी वाचतात. पुस्तके वाचलेली असतील तर त्याचा संदर्भ कोठे व कसा घ्यायचा हे कळेल, पण जर पुस्तकाला हात सुद्धा न लावणारे जेव्हा परीक्षेला सामोरे जातात, त्यांचं काय होणार? '२१ अपेक्षित' वर अवलंबून असणारे, शिकवणीमधील शिकविलेले पाठांतर करून परीक्षेत उत्तर लिहणारे व चांगले मार्क घेऊन जाणारे व पाठांतर करणारे व संकल्पना न समजणारे पण मेरिटमध्ये येणारे यांचं काय होणार? पुस्तका सहित परीक्षा साठीआमच्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना यासाठी आधी तयार करावं लागेल. काठिण्य पातळीचे प्रश्न तयार करावे लागतील. शिक्षकांना अधिकची प्रश्नपेढी तयार करावी लागेल. मुलांनी नुसतं उत्तर लिहिणं अपेक्षित नाही तर पुस्तकातल्या संदर्भावरून तो कुठे आणि कसा वापरायचा हे त्यांना कळायला हवं.

एका विषयात ३५ मार्क मिळवण्याचे ध्येय असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे कितपत पेलवेल, अंतर्गत गुणांच्या कुबड्यामुळे विद्यार्थी कसेतरी ३५ मार्क मिळवतात. पासचा टक्के वाढण्यासाठी अंतर्गत गुणांची सोय केली जाते. ढ मुलाला सुद्धा पास करण्यासाठी २० पैकी २० अंतर्गत गुण जर दिले जातात, तिथे तो विद्यार्थी पुस्तक असूनही परीक्षेत काय लिहिणार? घोड्याला पाण्याजवळ नेता येईल पण पाणी पिणे क्रिया घोड्यालाच करावी लागेल.

पुस्तक असूनही विद्यार्थ्यांना प्रश्न व त्याचे उत्तर लिहिता आले नाही तर व निकालाची टक्केवारी घसरली तर त्याला जबाबदार कोण? म्हणून पुस्तकासहित परीक्षेसाठी तयारी झाल्यानंतरच त्याची अंमलबजावणी करणे योग्य ठरेल. मुलांना पुस्तके जवळ करावी लागतील तरच पुस्तकांच्या पलीकडचे जे जे आहे ते त्यांना कळेल. अनेक संकल्पना पुस्तकाच्या बाहेर मुलांना कळतात पण त्यासाठी पुस्तकाचा संदर्भ असेल तर त्या संकल्पना लवकर कळतात म्हणून पुस्तके वाचून त्यातले संदर्भ जीवनात शोधता यायला हवेत. उपयोजन, मनन, चिंतन यापासून आजची पिढी खूप दूर आहे.

बंद पुस्तकी परीक्षांपेक्षा खुल्या पुस्तकांच्या परीक्षा सोप्या नसतात - अनेकदा त्या कठीण असतात. ओपन-बुक परीक्षेसाठी तुम्हाला खरोखर सामग्री समजून घेणे आणि माहिती आणि सामग्री लक्षात ठेवण्याऐवजी विश्लेषण करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. याचा अर्थ तुम्हाला निश्चितपणे अभ्यास करणे आणि संघटित होणे आवश्यक आहे कारण तुम्ही फक्त माहिती लक्षात ठेवू शकणार नाही! तुम्ही गोष्टी शोधण्यात किंवा प्रथमच साहित्य पाहण्यात परीक्षेचा मौल्यवान वेळ वाया घालवू इच्छित नाही. तुम्हाला वापरण्याची परवानगी असलेल्या सामग्रीसह तुम्हाला व्यवस्थित करणे आवश्यक आहे. 'ओपन-बुक' म्हणजे वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये वेगवेगळ्या गोष्टी, आणि तुम्ही काय आहात हे तुम्हाला माहीत आहे. तुम्हाला सर्वसाधारणपणे परीक्षेचे स्वरूप आणि लॉजिस्टिक्सदेखील समजून घेणे आवश्यक आहे. परीक्षा बहुविध निवड, समस्या सोडवणे किंवा निबंध आधारित आहे का हे जाणून घेणे आवश्यक आहे. परीक्षा पूर्ण करण्यासाठी किती वेळ लागेल हे देखील माहित असणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रशिक्षक आणि परीक्षा भिन्न असतात, म्हणून अभ्यासक्रम तपासा. तुम्हाला काही अस्पष्ट वाटत असेल, तर ती गोष्ट स्पष्ट करणे ही तुमची जबाबदारी आहे. लक्षात ठेवा, खुल्या पुस्तकाचा अर्थ असा नाही की तुम्हाला तयारी करण्याची किंवा अभ्यास करण्याची गरज नाही! तुमची ओपन बुक परीक्षा वेळेवर असेल तर हे आणखी महत्वाचे आहे. ओपन-बुक परीक्षांसाठी तुम्हाला 'उच्च पातळीची विचारसरणी' वापरण्याची आवश्यकता असल्यामुळे, तुम्हाला फक्त तथ्ये किंवा आठवणीबद्दल विचारले जाणार नाही. त्याऐवजी तुम्हाला माहितीची तुलना, विश्लेषण, मूल्यमापन किंवा संश्लेषण करण्यास सांगितले जाईल. तुमचे ज्ञान दाखवण्याचे हे मार्ग अधिक आव्हानात्मक आहेत आणि त्यासाठी आवश्यक आहे की तुम्हाला सामग्री सखोलपणे माहित असणे आणि कनेक्शन पाहण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. तुमच्या संदर्भ सामग्रीचा विचार केला जातो तेव्हा 'खूप जास्त' अशी एक गोष्ट आहे - तुमच्याकडे जितके जास्त आहे, तितकेच तुम्हाला हवे असलेले शोधण्यासाठी अधिक शोधणे आवश्यक आहे. तुमच्याकडे उपलब्ध आहे त्यामध्ये निवडक व्हा आणि तुम्ही जे काही वापरायचे किंवा संदर्भ साहित्य म्हणून आणायचे ठरवले ते व्यवस्थित केले पाहिजे.

तुमच्या नोट्स व्यवस्थित करा. भरपूर आणि बऱ्याच नोट्स तुम्हाला अधिक तयार होण्यास मदत करू शकतात, तरीही ते पाहणे अधिक असू शकते. मुख्य थीम आणि विषय ओळखा, महत्वाची माहिती सारांशित करा, विषयानुसार नोट्स व्यवस्थित करा, विषय कसे जोडले आहेत ते ओळखा इ. तुमची सामग्री तयार करा - मुख्य विषयांचे निर्देशांक तयार करा आणि त्या प्रत्येकावर तुम्हाला अधिक माहिती कुठे मिळेल ते ओळखा, महत्त्वाची पृष्ठे/चॅप्टर बुकमार्क करा, महत्त्वाच्या माहितीची यादी तयार करा (सूत्र, व्याख्या इ.), इ. परीक्षेदरम्यान, तुमचा वेळ प्रभावीपणे व्यवस्थापित करा.

आजच्या पिढीने वाचायला हवं. 'वाचाल तर वाचाल' हे माहीत असूनही विद्यार्थी जर वाचणारच नसतील, पाठ्यपुस्तके व अवांतर वाचन करणारच नसतील तर पुस्तके असून सुद्धा त्यांना परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे लिहिणे अवघड जाणार आहे. त्यासाठी पुस्तक वाचायलाच हवं. यानिमित्ताने एक होईल पुस्तके वाचण्याची सवय लागेल. स्पर्धा परीक्षा पास करणारे पुस्तक फाटेपर्यंत त्याच मनन, चिंतन करतात, तेव्हा कुठे त्यांना यश मिळतं. कोणती माहिती कुठे कशी लिहायची हे त्यांना अवगत होतं. खूप वाचल्यानंतर ते कुठे व कसं वापरायचं हे कळेल पण वाचलंच नाही तर कसं कळेल.

आधी चाचणी परीक्षेत व प्रायोगिक तत्त्वावरच याचा अवलंब करून काय परिणाम येतात हे पाहायला हवं. मुलांना वाचून यायला सांगितल्यानंतर अचानक उपयोजनाचे प्रश्न त्यांना दिल्यानंतर ते कशाप्रकारे पुस्तकाचा उपयोग करून उत्तर देतात हे पाहायला हवं. त्याचा सराव व्हायला हवा तरच हा प्रयोग यशस्वी होईल. पेपर फुटून प्रश्नपत्रिका बाहेर गेल्यानंतर ती उत्तरं कॉपी करून,पुस्तकात लपवून लिहिली तर त्याला प्रतिबंध कसा करणार? आधी पाया पक्का करावा लागेल, नाही तर इमारत कोसळणारच. पुस्तकांच्या असण्याने ज्ञानाच्या कक्षा रूंदावणारच आहेत. मुले विचार करायला शिकतील. विचाराने प्रश्नांची उकल करणे विद्यार्थी शिकतील. हाच शिक्षण प्रक्रियेतील अमुलाग्र बदल असेल. आजही सामान्य विद्यार्थ्यांना समोर ठेवूनच प्रश्नपत्रिका काढले जाते. कारण निकाल कमी लागणे कोणालाच परवडणार नाही. कोचिंगचे पॅटर्न बदलावे लागतील, गाईडमधील आशय बदलावा लागेल. शिक्षकांना प्रशिक्षित करावं लागेल. हे सर्व होणार असेल तरच नवीन मूल्यं व मापन रूजणार आहे.

# मायावतींना पंतप्रधान बनवण्यासाठी सांगलीतून खासदार देणार : डॉ.शंकर माने

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कवठेमहाकाळ : बहुजन समाज पार्टी तासगाव कवठेमहांकाळ मतदार संघामध्ये येणाऱ्या आगामी लोकसभेच्या निवडणुकीच्या तयारीसाठी बहुजन समाज पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा उत्तर प्रदेशच्या मा.मुख्यमंत्री बहन कुमारी मायावती यांच्या आदेशावरून बूत स्तरावर कार्यकर्त्यांना जोडून बहुजन समाज पार्टीचा खासदार निवडून आणण्याच्या दृष्टिकोनातून वाटचाल चालू आहे या अनुषंगाने मतदारसंघातील सेक्टर वाईज कार्यालयाचे उद्घाटन करण्याचे नियोजन केले आहे त्या अनुषंगाने नागज, ढालगाव, चोरोची, व सावळज येथे कार्यालयाचे उद्घाटन सांगली जिल्हा अध्यक्ष डॉ.शंकरदादा माने यांच्या हस्ते करण्यात आले कार्यालयाच्या उद्घाटनानंतर जमलेल्या जनसमूहाला संबोधित करण्यात आले.

यादरम्यान डॉ. माने बोलली की बहुजन समाजातील सर्व जनतेने एकत्रित येऊन आपला खासदार बनवला पाहिजे कारण आज पर्यंत या सत्ताधारी लोकांनी आपल्याला नाहक्क लुबाडण्याचे काम केले आहे आणि या लोकांनी आपल्या देशामध्ये आहाकार माजवला आहे हे सर्व थांबवण्यासाठी आपल्या राष्ट्रीय अध्यक्ष देशाच्या प्रधानमंत्री होणे गरजेचे आहे आणि त्यासाठी सर्व बहुजन समाजाने एकत्रित येऊन काम करणे आवश्यक आहे आपण सगळ्यांनी आपलं सरकार निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे सेक्टर वाईज कार्यालयाचे ओपनिंग करून या कार्यालयामध्ये जन सामान्याची कामे केली जाणार आहेत त्याचप्रमाणे ज्या शासनामार्फत येणाऱ्या योजना मोफत मध्ये जनसामान्याला दिल्या जाणार आहेत तरी यावेळी आव्हान करण्यात आले की सर्वसामान्य गोरगरीब लोकांनी या कार्यालयाचा उपयोग करून घ्यावा हे कार्यालय सर्वसामान्यांचे कार्यालय आहे ना कोणत्या श्रीमंत शेठजींचे. फक्त सर्वसामान्य बहुजन समाजाचे हे कार्यालय आहे तरी या कार्यालयाचा लाभ सर्वांनी घ्यावा कार्यालय उद्घाटन प्रसंगी डॉ.शंकरदादा माने जिल्हाध्यक्ष बसपा विधानसभा अध्यक्ष उज्वला, धोत्रे बहुजन समाज पार्टीच्या जिल्हा प्रभारी सविता माने,सरपंच संजना आठवले सामाजिक कार्यकर्ते मंगेश सावंत, शुभम चव्हाण तालुका अध्यक्ष,राखी शिंदे कवठेमहांकाळ तालुका अध्यक्ष महिला. .सिद्धनाथ माने. अमोल वाघमारे. सुनिल खोत. विशाल कर्पे. जालिंदर मोहिते. सुभाष मराठे. संजय सनदी. गौतम कांबळे. प्रताप खोत. वैभव शिंदे. संतोष वनखडे. भानुदास आठवले. विजय माने. विशाल कांबळे. सुमित गाडे. संतोष वानखडे,प्रमिला कदम. सविता कदम. प्रियांका खोत. श्रीदेवी खोत. संगीता जाधव. लता साबळे. सुरेखा मोहिते. रेश्मा साठे. यासह बहुजन समाज पार्टी व बहुजन कामगार संघटनेमध्ये कामगार, ग्रामस्थ, सभासद पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



# आष्ट्यात ४ बगीच्यासाठी ४ कोटी ३२ लाख रुपये मंजूर : प्रवीण माने

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

आष्टा : पालकमंत्री सुरेश खाडे आणि भाजपाचे जिल्हाध्यक्ष निशिकांत भोसले पाटील यांच्या सहकार्यातून आष्टा शहरात चार ठिकाणी बगीचा उभारणीसाठी ४ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष प्रवीणभाऊ माने यांनी दिली.

प्रवीणभाऊ माने म्हणाले, आष्टा शहरातील हिंदू स्मशानभूमी येथे सुधारणा व सुशोभीकरण करणे,बगीचा उभारणीसाठी १ कोटी ९९ लाख ८० हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच शिराळकर कॉलनी येथे खुली जागा विकसित करणे,बगीचा उभारणीसाठी ७६ लाख ७८ हजार रुपये निधी मंजूर झाला आहे. गौतम हौसिंग सोसायटीत खुली जागा विकसित करणे, बगीचा उभारणीसाठी १ कोटी ४५ लाख ७६ हजार रुपये इतका निधी मंजूर झाला आहे. तासगांव रस्त्याशेजारील जल शुद्धीकरण केंद्र परिसरात सुशोभीकरणासाठी ९ लाख ९९ हजार रुपये मंजूर झाले आहेत. एकूण चार ठिकाणी बगीचा उभारणीसाठी ४ कोटी ३२ लाख रुपये मंजूर झाले आहेत. शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या मागणीचा विचार करून भारतीय जनता पार्टीने एवढा मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. भारतीय जनता पार्टी, पालकमंत्री सुरेश खाडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष निशिकांत भोसले पाटील यांच्या माध्यमातून आष्टा शहरासाठी आतापर्यंत तीस कोटीहून अधिक रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. कमी कालावधीत एवढा मोठा निधी शहराच्या इतिहासात प्रथमच मंजूर झाला आहे. शहरात गतीने विकास कामे सुरू आहेत. कामे दर्जेदार होण्यासाठी आम्ही आग्रही आहोत. भविष्यातही नागरिकांच्या मागणीचा विचार करून मोठा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहोत.



# कुरळप गावात जोतिबा मंदिराचे बांधकाम सुरु

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

तांदुळवाडी : वाळवा तालुक्यातील कुरळप गावात जोतिबा मंदिराचे मोठया प्रमाणात बांधकाम सुरु असून वेगवेगळ्या संघटना दानशूर वेक्ती या कामासाठी सढळ हाताने मदत करत आहेत या बांधकामासाठी कुरळप सह परिसरातील गवंडी मजूर हे श्रमदान करत आहेत. तर कोरीव दगडामध्ये मंदिराच्या गाभाऱ्याचे काम पूर्ण झाले असून अजून ही सभा मंडप शिखर यासारखे ६० टक्के काम अपुरे आहे यासाठी देवस्थान समिती कडून सर्वाना मदतीसाठी आव्हान करण्यात आले होते याला प्रतिसाद देत कुरळप येथील जाधव भावकीकडून मंदिराच्या बांधकामासाठी ७९२२१ रुपयांची देणगी देण्यात आली आहे.



भावकी भावकीची भांडणे विकोपाला गेलेले आपण आजवर पाहत व ऐकत आलो आहे मात्र शंभर जणांचा असणाऱ्या भावकीने एकत्र येत एका देवाच्या मंदिर बांधकामा साठी हजारो रुपयाची देणगी देऊन समाजापुढे एक आगळा वेगळा आदर्श घालून दिला आहे.यामुळे कुरळप सह परिसरातून जाधव भावकीचे कौतुक होत आहे. तर भावकी भावकीत तेढ असल्याने एकमेकांचे तोंड ही न पाहनारी भावकी आपण आजूबाजूला पाहत असतो मात्र याला दुजारो देत कुरळप येथील जाधव भावकीने एकोपा जपत मंदिरास देणगी देऊन इत्तरांसमोर एक आदर्श ठेवला आहे यासाठी जोतिर्लिंग भक्त मंडळाचे विश्वास सुतार, विठ्ठल जाधव, अशोक रणदिवे, मार्गदर्शक बाबासाहेब देवकर, शिवाजी देवकर शिवाजी पाटील वसंत जाधव पांडुरंग सुतार व समस्त गावाकऱ्यांच्या वतीने जाधव भावकीचे आभार मानले.

# शिक्षकांचे सर्व प्रश्न लवकरच निकाली काढू : गटशिक्षणाधिकारी अन्सर शेख

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

जत : जत पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी मा. श्री अन्सर शेख साहेब यांची जत तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली यामध्ये जत तालुक्यात उनाची तीव्रता खूपच वाढत चालली आहे. सर्व माध्यमिक शाळा सकाळ सत्रात भरत आहेत लहान मुलांची शारीरिक आणि मानसिक क्षमता लक्षात घेता प्राथमिक शाळा सकाळ सत्रात सुरु होणे गरजेचे आहे. यासाठी आपल्या स्तरावरून पाठपुरावा करण्यात यावा,सेवा पुस्तिकेसाठी केंद्र स्तरावर कॅम्प सुरु करावा, शिक्षकांची विविध प्रलंबित बिले तात्काळ मंजूर करून त्यांच्या खात्यात पैसे वर्ग करावीत, अश्या विविध मागण्याचे निवेदन देऊन साहेबांच्या बरोबर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी मा. साहेबांनी वरील सर्व प्रश्नांची तातडीने दखल घेऊनपूर्ण करू असे आश्वासन दिले.. यावेळी शिक्षक बँकेचे संचालक मा. फत्तू नदाफ, जत तालुका शिक्षक संघांचे अध्यक्ष मा. दिलीप पवार आदी उपस्थित होते.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# लोकशाही, स्वातंत्र्य, संविधानाच्या रक्षणासाठी प्रत्येकाने डोळस बनावे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

आटपाडी : भारतीय लोकशाही, स्वातंत्र्य, संविधान आबाधीत रहावे यासाठी प्रत्येक भारतीयाने यापुढच्या काळात डोळसपणे भूमिका बजावली पाहीजे असे मत सुशांत देवकर, आनंदरावबापू पाटील आणि सादिक खाटीक यांनी व्यक्त केले. जलसंपदाच्या स्थापत्य विभागात सहाय्यक अभियंता म्हणून निवड झालेले मिटकीचे श्री. निवास जगन्नाथ कोळपे यांचा तसेच प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षक म्हणून गोंदिया जिल्ह्यात निवड झालेल्या मिटकीच्याच सौ. मोनिका आकाराम कोळपे यांचा सत्कार मिटकी ग्रामस्थांच्या वतीने आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे खानापूर विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष सुशांत देवकर आणि राष्ट्रवादी पक्षाचे आटपाडी तालुका अध्यक्ष आनंदरावबापू पाटील यांच्या हस्ते फेटा शाल श्रीफळ हार घालून सत्कार करणेत आला. त्यावेळी हे मान्यवर बोलत होते .



सत्कारमूर्तींना शुभेच्छा देवून सुशांत देवकर यांनी, आटपाडी तालुक्यात पाण्याचा कायम दुष्काळ असतानाही या भागाने नेहमीच विचाराच्या श्रीमंतीचे दर्शन घडविले आहे . थोरा मोठ्यांची जननी असलेल्या या भागातल्या लोकांनी प्रचंड कष्ट, यातना सहन करीत वाटचाल केली आहे . बहुजन, अल्पसंख्याक, शेतकरी, कष्टकरी, महिला वगैरे सर्वच समाज घटकांसाठी राष्ट्रीय नेते शरदचदजी पवार साहेबांनी केलेले प्रचंड कार्य देशात स्पृहनीय आहे, असे आपल्या भाषणात स्पष्ट केले. क्रांतीवीर नागनाथआण्णा नायकवडी , डॉ . भारत पाटणकर यांच्या प्रदिर्घ लढ्यातूनच या भागात कृष्णाईचे पाणी आल्याचे स्पष्ट करून आनंदरावबापू पाटील यांनी, कुटुंबांच्या, भागाच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने सर्व क्षेत्रातल्या शिक्षणाला आत्मसात करीत भागाचा नावलौकीक वाढवावा असे आवाहन केले .

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेशचे उपाध्यक्ष सादिक खाटीक यांनी आपल्या भाषणात , या कायम दुष्काळी आटपाडी तालुक्यातल्या अनेक पिढ्या पाणी पाणी चा टाहो फोडत बरबाद झाल्या. अनंत यातना, अपरिमित कष्ट करणारांनी, मिळेल त्या व्यवसाय, उद्योगातून अगदी हमाली पासून भटकंती, स्थलांतरातून जगण्यासाठी देशाला जवळ करण्याचा प्रयत्न केला . पन्नास वर्षापूर्वी या भागात कृष्णेचे पाणी आले असते तर, सर्वच क्षेत्रात देशाला गवसणी घालणारी गुणवत्ता आटपाडी तालुक्यातील प्रत्येक वाडी, वस्ती, खेडे, गाव, शहरातून पुढे आली असती . एवढे प्रचंड ज्ञान, बौध्दिकता, विचारांची समृद्धी येथे आहे . आटपाडी तालुक्यातील अतिशय कष्टाळू, प्रामाणिक, जिगरबाज हजारो उच्चशिक्षित मुले पुण्या - मुंबई सारख्या प्रचंड खर्चिक शहरांच्या ठिकाणी नाईलाजाने तुटपुंज्या पगारात काम करतात, हे दुर्दैवी आहे . आटपाडी तालुक्यातच बेंगलोर कॉरीडोर सारख्या अद्ययावत औद्योगिक वसाहती, विविध उद्योग, वेगवेगळ्या प्रकारची कारखानदारी, कुशलता वाढीस लावणाऱ्या निरनिराळ्या व्यवस्थांचे जाळे निर्माण झाल्यास शहराकडे गेलेली ही उच्चपदस्थ तरुणाई आटपाडी तालुक्यातच स्वतःच्या आर्थीक प्रगतीबरोबर, भागाच्या प्रचंड विकासात मोठे योगदान देईल. यासाठी भागातल्या नेतृत्वाने मोठी पावले टाकली पाहिजे, असे आवाहन केले.

# सीपीआरमध्ये यशस्वीरीत्या पार पडल्या दोन अवघड शस्त्रक्रिया

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर; गोरगरिबांचा आणि थोरला दवाखाना म्हणून ओळखला जाणाऱ्या सी पी आर रुग्णालयामध्ये ८० टक्के भाजलेल्या साडेचार वर्षाच्या लावण्य गुरव या चिमुकलीवर यशस्वी शस्तक्रिया पार पडली.तर सुमिती थाळे या ४५ वर्षीय महिलेची गळ्याजवळची भली मोठी थायरॉईडची गाठ यशस्वीरित्या काढण्यात डॉक्टरांना यश आले. अशी माहिती शस्त्रक्रिया विभाग प्रमुख डॉक्टर वसंतराव देशमुख, यांनी पत्रकार परिषदेत दिली.



लावण्या गुरव या साडेचार वर्षाच्या चिमुकलीच्या अंगावर गरम पाणी पडल्याने ती भाजली होती. तिच्या पालकांनी तिला सी.पी.आर हॉस्पीटल मध्ये दाखल केले.ती जवळपास ७०-८०% भाजली होती. सहसा अशा प्रकारच्या रुग्णामध्ये वाचण्याची शक्यता खुप कमी असते.सी.पी.आर. मधील शल्यचिकीत्साशास्त्र विभागात अतिदक्षता विभागात तिच्यावर उपचार सुरु करण्यात आले. प्लास्टिक सर्जन डॉ प्रशांत चौधरी व सहकाऱ्यांनी तिच्यावर उपचार केले रुग्णही उपचाराला योग्य प्रतिसाद देत होता. जवळपास महिन्याभरात मुलगी पुर्णपणे बरी झाली व तिला घरी सोडण्यात आले.ही शस्त्रक्रिया विभाग प्रमुख डॉ वसंतराव देशमुख, व डॉ शिवप्रसाद हिरुगडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ मधुर जोशी,डॉ प्रशांत चौधरी, डॉ हर्ष वैष्णव, डॉ संपदा जोशी, डॉ रोशिल चारुथा, डॉ क्रिसलीना, डॉ श्रीमीक्रश बंडगर व सहकाऱ्यांनी सदर मुलीला जीवनदान दिले.

यासाठी संस्थेचे डीन मा. एस. एस. मोरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तर सुमती थाळे या वाशिम येथील ऊसतोड मजूर महिला कोल्हापूरला टोळीसोबत आल्या होत्या. त्यांच्या गळ्याला मोठी गाठ होती. ही गाठ गेले १५वर्षे त्यांना होती पण त्यांनी दुर्लक्ष केले. जवळ जवळ २५४२५ला इतकी मोठी गाठ असल्याने त्यांना श्वास घ्यायला त्रास होता.श्वसनाच्या विकारामुळे त्यांनी सी.पी. आर. हॉस्पीटलमध्ये सर्जरी विभागत दाखवले. इतक्या मोठ्या थायरॉईड ग्रंथीचे ऑपरेशन करणे गरजेचे होते. रुणाच्या सर्व तपासण्या केल्या असता असे लक्षात आले की अंगात रक्त कमी होते. रुग्णाला रक्त चढवण्यात आले. थायरॉईड ग्रंथीचे ऑपरेशन करणे अतिशय जिकरीचे होते. कारण सदर शस्त्रक्रियेदरम्यान अतिरक्तस्त्राव आवजात बदल तसेच शस्त्रक्रियेनंतर गळ्याव्दारे श्वासाचा मार्ग (Tracheoshtomy) व व्हेंटीलेटरची गरज लागण्याची शक्यता होती. आणि गुंतागुंतीचे शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली.

# कवी भीमराव धुळूबुळू यांच्या कवितासंग्रहाला यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**



मिरज : स्व. प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्ट व गंगा लॉज मित्र मंडळ पुणे यांच्यावतीने दिला जाणारा यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार २०२४ हा दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा या संस्थेचे अध्यक्ष कवी भीमराव धुळूबुळू यांच्या प्रतिभा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'काळजाचा नितळ तळ' या कवितासंग्रहास जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा बारा मार्च या यशवंतराव चव्हाण जयंतीच्या दिवशी रात्री नऊ वाजता टिळक स्मारक मंदिर पुणे येथे संपन्न होत असून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार,विश्वकोष निर्मिती मंडळ कवी भीमराव धुळूबुळू यांच्या कवितासंग्रहाला यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार अध्यक्ष राजा दिक्षित,आमदार सुनिल टिंगरे ,महाराष्ट्र साहित्य परिषद कार्याध्यक्ष मिलिंद जोशी आदी मान्यवरांच्या हस्ते होत आहे .यावेळी महाराष्ट्रातील नामवंत कवींचे कविसंमेलनही आहे. गेली ३७ वर्षे हे पुरस्कार दिले जातात. जेष्ठकवी रामदास फुटाणे,विजय ढेरे ,संजय ढेरे,व सचिन जाधव याचे संयोजन करतात.

या वर्षी कलाक्षेत्रातील जीवन गौरव पुरस्कार दिग्दर्शक ,पटकथाकार अभिनेते विलास रकटे यांना तर अनिल धाकू कांबळे यांच्या 'इष्टक' व गीतेश शिंदे यांच्या 'सि सि टिव्हीच्या गर्द छायेत' या कविता संग्रहाना देखील हे पुरस्कार मिळाले आहेत.कलाक्षेत्रातील जीवन गौरव पुरस्कार सन्मानचिन्हा सोबत पंचवीस हजारांचा असून साहित्य पुरस्कार सन्माचिन्हा सोबत प्रत्येकी आकरा हजार रुपयांचे आहेत . यापूर्वी नाना पाटेकर,मकरंद अनासपुरे,सचिन पिळगावकर,सयाजी शिंदे, नागराज मंजुळे,दिलीप प्रभावळकर ,अजय अतुल या कलाक्षेत्रातील लोकांना तर ना. धो. महानोर,रा.ग. जाधव शंकर सारडा,नारायण सुर्वे,दया पवार,रंगनाथ पठारे,निर्मलकुमार फडकुलेचंद्रकुमार नलगे,सदानंद मोरे ,अरुणा ढेरे ,जगदिश खेबुडकर ,अनुराधा पोतदार अशा मान्यवर साहित्यिकांना हा साहित्य गौरव परस्कार मिळाला आहे.

# कंत्राटी कामगारांच्या करिता २ दिवसात होणार बैठक

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : राज्यातील महानिर्मिती महावितरण आणि महापारेषण या वीज कंपन्यातील कंत्राटी कामगारांचा विविध मागण्यांसाठी आजपासून बेमुदत संप दि ५ मार्च पासून महाराष्ट्र राज्य भर चालू आहे या संपा मधे ९५% पेक्षा जास्त कंत्राटी कामगार सहभागी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर कृती समिती च्या पदाधिकारी यांनी सहाद्री अतिथीगृहात मा उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री मा ना देवेंद्रजी फडणवीस यांची भेट व चर्चा करून कंत्राटी कामगारांना न्याय द्यावा अशी आग्रही मागणी केली या बाबतीत शासन स्तरावर २ दिवसात बैठक आयोजित करून कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न करू असे आस्वासन मा ना देवेंद्रजी फडणवीस यांनी कृती समिती च्या पदाधिकारी यांना दि ७मार्च २०२४ रोजी दिलेले आहे. या कृती समिती चे पदाधिकारी श्री नीलेश खरात, नचिकेत मोरे, आदी पदाधिकारी उपस्थित होते.



महानिर्मीती च्या व्यवस्थापकीय संचालक मा अनबलगन यांनी दि ६ मार्च रोजी कृती समिती पदाधिकारी समावेत सकारात्मक चर्चा करून कंत्राटी कामगारांची समस्या जाणून घेवून कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले आहे पण कोणत्याही ठोस आस्वासन दिले नाही.

महत्वपूर्ण मागण्या१) राज्यातील तिन्ही वीज कंपन्यातील कंत्राटी कामगारांच्या कंत्राटदाराकडून होणारी आर्थिक पिळवणूक दूर करण्यासाठी कंत्राटदार विरहित रोजगार द्यावा २) कामगारांच्या वेतनात जीवन वेतन द्यावे ३) रोजंदारी कामगार पद्धती द्वारे शाश्वत रोजगार द्यावा. मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समिती तर्फे राज्यातील सुमारे ४२ हजार वीज कंत्राटी कामगारांचा दि ५ मार्च रात्री बारा वाजल्यापासून बेमुदत संप पुकारण्यात आला आहे. या बाबतीत गेल्या १५/२० वर्षांपासून न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या कामगारांना शासनाने सकारात्मक चर्चा करून पुर्तता करावी अशी मागणी कृती समिती संघटक सचिन मेंगाळे यांनी व्यक्त केली आहे.

महानिर्मीती च्या व्यवस्थापकीय संचालक यांनी पुढाकार घेतला तसेच पुढाकार महापारेपण कंपनी व महावितरण कंपनी प्रशासन घेवून कंत्राटी कामगारांना न्याय द्यावा अशी मागणी कृती समिती निमंत्रक रोशन गोस्वामी यांनी व्यक्त केली प्रशासन जर या मागण्यांकडे कानाडोळा करत असेल तर हे कंत्राटी कामगारांसाठी बेमुदत आंदोलन पुढे सुरू राहणार आहे.

# स्वत:त बदल कराल तरच सुदृढ बनाल: डॉ. ऐनापुरे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली: तुम्ही आनंदी, उत्साही, निरोगी राहिलात तरच तुमचे घर आनंदी निरोगी राहील. त्यासाठी वेळ, काळ, परिस्थितीनुसार बदलता आले पाहिजे. जिभेवरती कंट्रोल ठेवता आला पाहिजे. संशय न घेता, अति अपेक्षा न ठेवता, बोलताना गोपनियता ठेवता आली पाहिजे. असे बदल केले तरच आपण शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ बनू, असा मोलाचा सल्ला डॉ. अर्चना ऐनापुरे यांनी दिला.



पंचशीलनगरमधील योग अर्चना क्लासच्यावतीने आज जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सागर वाखरेकर, अमित गायकवाड यांनी विविध स्पर्धांचे आयोजन केले. प्रवीण कांबळे यांनी काव्यवाचन, श्रीकांत कबाडे यांनी गीतगायन, प्रदीप कांबळे फलक लेखन तर मिसबा काझी यांनी नृत्य सादर केले. सर्वांना गुलाबाचे रोप देण्यात आले. अनुप ननवारे व इतरांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ.संभाजी जाधव यांनी केले. आभार सचिन सुतार यांनी मानले.

# माझी मुलगी माझा अभिमान संकल्पनेतून उमदी पोलिस ठाण्यात महिला दिन साजरा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

जत : उमदी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप शिंदे यांनी माझी मुलगी.. माझा अभिमान या संकल्पेतून आज जागतिक महिला दिनानिमित्त पोलिस ठाण्याचे कारभार महिला अंमलदार यांच्याकडे सोपवून दैनंदिन कामकाज करून घेवून पुरुषापेक्षा महिला कमी नाहीत हे दाखवून दिली. जिल्हा पोलिस अधीक्षक संदीप घुगे , अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोकर व जतचे पोलिस उप विभागीय पोलिस अधिकारी सुनील साळुंखे यांच्या सांकल्पेतून माझी मुलगी माझा अभिमान या विचारातून जागतिक महिला दिनानिमित्त उमदी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप शिंदे यांनी एक दिवसाचा कारभारच महिला अंमलदार यांच्याकडे सोपविला आणि दिवसभर पोलिस ठाण्यात महिलाराज दिसून आले आणि महिला अंमलदार यांनी आपल्या महिला पोलिसांना मदतीला घेवून ठाणे अंमलदार मदतनीस, पोलिस ठाणे गोपनीय कामकाज, वायरलेस, लेखनिक, सिसिटीएनएस, वाहतूक नियंत्रण, पेट्रोलिंग पथक, व रेड पथक हे सर्व कामकाज महिला अंमलदार यांनी चोख बजावले , महिला पोलिस पथकाने पोलिस ठाणे हद्दीतील अवैद्य धंद्यावर प्रभावीपणे कारवाई केली शिवाय पोलिस ठाणे हद्दीत नाकाबंदी करून वाहतूक अधिनियम अंतर्गत कारवाई केल्या पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गावात पेट्रोलिंग करून पुरुषापेक्षा आम्ही कमी नाहीत हे महिला दिनी दाखवून देवून दैनंदिन पोलिस ठाण्याचे कारभार यशस्वी रित्या पार पाडली आणि दैनंदिन कामकाजानंतर महिला पोलिस अंमलदार यांचा सन्मान करण्यात आला.



# भटक्या कुत्र्यांचा, अंमली पदार्थांच्या विक्रीच्या रॅकेटचा बंदोबस्त करा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : शहराच्या रस्तोरस्ती भटक्या कुत्र्यांनी अक्षरशः थैमान घालत आपली दहशत बसवली आहे. शहरात ८००० च्या वरती भटक्या कुत्र्यांची संख्या असून जिल्ह्यात आजवर ३००० पेक्षा जास्त नागरिकांना या कुत्र्यांनी चावा घेतला असल्याने आज नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. मागच्याच महिन्यात एका चिमुकलीवर जीव घेणा हल्ला झाला आणि त्यानंतर आता एका तरुणीचा कुत्रा चावल्यामुळे रेबीजची लागण होऊन हकनाक बळी गेला. ही चिंतेची बाब असताना महापालिका भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाची तात्पुरती मलमपट्टी करून आपले अंग झटकत असल्याने महापालिका आणि प्रशासनाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



शहरात ठीक-ठिकाणी, चौकात उपनगरात छोटी मोठी हॉटेल्स व मांसाहार विक्री करणारे गाडे तसेच दुकाने असल्याने मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला आहे. दिवसभर न दिसणाऱ्या कुत्र्यांचा कळप रात्री ९ नंतर मात्र रस्त्यावर ठाण मांडून बसलेला दिसतो. दुचाकी स्वारांना रस्त्यावरून जाताना कुत्र्याच्या दहशतीमुळे जीव मुठीत घेऊन जावे लागते. सीपीआर हॉस्पिटलमध्ये दररोज २० रुग्ण हे श्वानदंशाचे उपचार घेत आहेत. भटक्या कुत्र्यांची ही दहशत रोखण्यासाठी आता स्थानिक प्रशासनाने विशेष लक्ष देऊन त्यांचा वेळेत बंदोबस्त करणे गरजेचे आहे अशा कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांचे निर्बीजीकरण करणे हा एकमेव पर्याय असला तरी कोल्हापूर महानगरपालिका वगळता अशी यंत्रणा कोणत्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नाही हे वास्तव आहे. आता ग्रामीण भागात जिल्हा परिषदेने तर नगरपालिका क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्थेने यंत्रणा निर्माण करणे गरजेचे आहे. भटक्या कुत्र्यांच्या दहशतीपासून नागरिकांचे संरक्षण करावे व त्यांचा वेळेत बंदोबस्त करावा तसेच कोल्हापुरातील छोट्या छोट्या टपऱ्या पानपट्टीच्या गाड्या जिथे अमली पदार्थांची विक्री होते त्या सर्व टपऱ्या पान पट्टी गाडी दुकानावर कारवाई करून लायसन्स असणाऱ्या गाड्यांची लायसन्स जप्त तसेच लायसन नसणाऱ्या गाड्या जप्त करून कठोर कारवाई करावी करावी तसेच या टपऱ्या परत उभारणार नाही याची दक्षता घ्यावी अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या वतीने आज आयुक्त के.मंजूलक्ष्मी यांना देण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसुळ, सहाय्यक आयुक्त डॉ.विजय पाटील उपस्थित होते. निवेदन देणेसाठी जिल्हाध्यक्ष व्ही.बी.पाटील, शहराध्यक्ष आर.के.पोवार, पद्मा तिवले अनिल घाटगे, सुनील देसाई, महादेव पाटील रियाज कागदी गणेश जाधव मुसाबाई कुलकर्णी लहुजी शिंदे, राजेंद्र ओंकार, सुरेश कुरणे ,रामराजे बदाले, सादिक आत्तार,, फिरोज खान,उस्ताद संदीप साळुंखे अंजली पोळ शशिकला नाईक सुरेश कुराडे परेश टिपू गडे इत्यादी सह राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित. होते.

# बोरगाव हायस्कूल हायस्कूलमधील संस्कार प्रेरणादायी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

इस्लामपूर : बोरगाव हायस्कूल हायस्कूलमधील संस्कार प्रेरणादायी आहेत, जगण्याचे व लढण्याचे बळ देणारे आहेत,असे प्रतिपादन प्रसिद्ध दंतवैद्य डॉ.अश्विनी प्रमोद मोहितेचव्हाण यांनी केले.बोरगाव ता. वाळवा येथील बोरगाव प्राथमिक विद्यालय व बोरगाव हायस्कूलच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या.शिक्षण प्रसारक संस्था बोरगावचे अध्यक्ष विष्णुपंत शिंदे अध्यक्षस्थानी होते.परिवहन अधिकारी अक्षय पोपट पाटील, बोरगाव हायस्कूल हायस्कूलमधील संस्कार प्रेरणादायी संस्थेचे उपाध्यक्ष उदयसिंह पाटील, सचिव गुरुवर्य एस.टी.पाटील, शाळा समितीचे अध्यक्ष संजय पाटील,संचालक सुरेशराव पाटील,अरुण नाईक, सदस्य शामराव वाटेगावकर, अशोकराव पाटील, मुख्याध्यापिका एस एस माने, सौ.उषा सलगर,सौ.दिपाली पाडळे, श्रीतेज पाटील, भक्ती देवकाते यांची प्रमुख उपस्थिती होती.



डॉ.मोहिते म्हणाल्या बोरगाव हायस्कूलमध्ये शैक्षणिक जडणघडण चांगल्या प्रकारे झाली बौद्धिक ज्ञानाबरोबरच वक्तृत्व,कला,क्रीडा इत्यादीचे संस्करण झाले चांगल्या व दर्जेदार शिक्षणामुळे करिअर घडले.

प्रमुख पाहुणे अक्षय पाटील म्हणाले, आई,वडील व बोरगाव हायस्कूलमधील सर्व गुरुजणांमुळे आयुष्याला कलाटणी मिळाली. आरटीओ परीक्षेचा अभ्यास करताना अनेक अडचणी आल्या. लॉकडाऊनच्या काळात खचून न जाता जिद्दीने अभ्यास केला.उगवत्या पिढीने जिद्द,चिकाटी,आत्मविश्वास बाळगला पाहिजे. याप्रसंगी विद्यालयातील चिमुकल्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. मान्यवरांच्याहस्ते पारितोषीक वितरण झाले.निवृत्त मुख्याध्यापक टी.ए यादव, शिवाजी चव्हाण, जे.एस.पाटील, के.जी.पाटील, मोहनराव शिंदे, युवराज कांबळे,यांच्यासह अन्य मान्यवर व पालक उपस्थित होते. एस एस माने यांनी प्रास्ताविक केले.दत्तात्रय फसाले यांनी

सूत्रसंचालन केले. दिपक चौधरी, प्रकाश पाटील यांनी बक्षिस वितरण समारंभाचे समलोचन केले.विनय देसाई यांनी आभार मानले.

# टीम इंडियाने कसोटी मालिका जिंकली

## ४-१ ने मालिकेवर कब्जा ; इंग्लडवर एक डाव ६४ धावांनी विजय

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

धर्मशाला : धर्मशाला येथे खेळवण्यात आलेल्या पाचव्या कसोटीत भारताने इंग्लंडचा पराभव केला आहे. इंग्रजांना एक डाव आणि ६४ धावांनी मानहानीकारक पराभव स्वीकारावा लागला. पहिल्या डावात २५९ धावांनी पिछाडीवर पडल्यानंतर इंग्लंडचा संघ दुसऱ्या डावात १९५ धावांत आटोपला. अशा प्रकारे भारताने ही मालिका ४-१ अशी जिंकली आहे. दुसऱ्या डावात इंग्लंडसाठी फक्त जो रूटला थोडासा संघर्ष करता आला. याशिवाय बाकीचे इंग्लिश फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर हतबल आणि असहाय्य दिसत होते. विशेषत: टीम इंडियाच्या फिरकीपटूंना इंग्लिश फलंदाजांकडे उत्तर नव्हते.

इंग्लंडकडून दुसऱ्या डावात जो रूटने सर्वाधिक धावा केल्या. त्याने ८४ धावांची चांगली खेळी केली. पण ब्रिटिश टॉप ऑर्डर पुन्हा सपशेल फसली. सलामीवीर जॅक क्रोली एकही धाव न काढता रवी अश्विनच्या चेंडूवर बाद झाला. बेन डकेट २ धावा करून बाहेर पडला. ओली पोप १९ धावा करून पॅव्हेलियनमध्ये गेला. मात्र, जॉनी बेअरस्टोने ३९ धावांची छोटी पण चांगली खेळी खेळली. इंग्लिश कर्णधार बेन स्टोक्स २ धावा करून बाद झाला. त्यानंतर बेन फॉक्सला रवी अश्विनने स्वस्तात बोल्ड केले. दुसऱ्या डावात भारतासाठी रवी अश्विन हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. रवी अश्विनने ५ फलंदाजांना बाद केले. जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादव यांना प्रत्येकी २ यश मिळाले. रवींद्र जडेजाने शोएब बशीरला बाद केले.

भारताने ५ कसोटी सामन्यांची मालिका ४-१ अशी जिंकली आहे. मात्र, या मालिकेची सुरुवात भारतासाठी चांगली झाली नाही. पहिल्या कसोटीत इंग्लंडने भारताचा पराभव केला, मात्र त्यानंतर टीम इंडियाने शानदार पुनरागमन केले. विशाखापट्टणम नंतर भारताने राजकोट, रांची आणि धर्मशाला येथे इंग्रजांचा सहज पराभव केला.

भारतीय संघाने पहिल्या डावात ४७७ धावा केल्या. त्यामुळे भारताला २५९ धावांची मोठी आघाडी मिळाली. भारताकडून रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी शतके झळकावली. रोहित शर्माने १०३ धावा केल्या. तर शुभमन गिलने ११० धावांचे योगदान दिले. याशिवाय देवदत्त पडिकल




**धर्मशाला : येथे इंग्लडवर ४-१ ने विजय मिळविलेला टीम इंडियाचा संघ ट्रॉफीसह**

आणि सरफराज खान यांनी अर्धशतक केले. इंग्लंडकडून शोएब बशीर सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. शोएब बशीरला ५ यश मिळाले. जेम्स अँडरसन आणि टॉम हार्टलीने १-१ विकेट घेतली. बेन स्टोक्सने रोहित शर्माला बाद केले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या इंग्लंडने २१८ धावा केल्या. इंग्लंडकडून सलामीवीर जॅक क्रॉलीने सर्वाधिक ७९ धावा केल्या. पण याशिवाय एकाही इंग्लिश फलंदाजाला पन्नास धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. पहिल्या डावात भारतासाठी कुलदीप यादव सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. कुलदीप यादवने ५ बळी घेतले. रवी अश्विनला ४ यश मिळाले. रवींद्र जडेजाने जो रूटला बाद केले. सामनावीर पुरस्कार हा दोन्ही डावात मिळून ७ बळी घेणाऱ्या कुलदीप यादवला तर मालिकावीर पुरस्कार हा ७१२ धावा करणाऱ्या यशस्वी जैस्वालला देण्यात आला.

# सतेज पाटील यांना इतका बालिशपणा आला कोठून:हसन मुश्रीफ यांची विचारणा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : आदर असेल तर शाहू छत्रपती यांना कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून महायुतीने बिनविरोध करावे, असे आवाहन करण्याइतका बालिशपणा सतेज पाटील यांच्यात आला कोठून ? राजकारणात असे होत असते का ? असे प्रश्न पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी शनिवारी विचारले.



उमेदवारीसंबंधी शाहू छत्रपती यांच्यासंबंधी आदर असल्याचे म्हटले होते. हा धागा पकडून काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील यांनी खरोखर आदर असेल तर शाहू छत्रपती यांना बिनविरोध निवड करा, असे आवाहन केले होते. यावर पालकमंत्री मुश्रीफ यांनी सतेज पाटील यांनी टिका केली.

पालकमंत्री मुश्रीफ म्हणाले, समरजित घाटगे यांच्या उमेदवारीबद्दल मला काहीही माहिती नाही. कोल्हापूरची जागा एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. सद्या त्यांचे उमेदवार संजय मंडलिक आहेत. लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीसंबंधी दिल्लीतील बैठकीसाठी आमचे नेते अजित पवार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस गेले आहेत. ते महायुतीकडून कोणाला उमेदवारी देतील, त्यांच्या पाठिशी ठामपणे उभा राहू. नेतृत्व करू. हाडाचे काडे करून निवडून आणू. निवडणुका जवळ आल्यानंतर विकास कामांचे उदघाटन करून फायदा घेण्याचा प्रयत्न सर्वच राजकीय पक्ष घेत असतात.

# संजय मंडलिक यांनाच शिवसेनेची उमेदवारी द्या

## आमदार प्रकाश आबिटकरांनी मुख्यमंत्र्यांकडे धरला आग्रह

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : सर्वसामान्यांचे खासदार म्हणून शिवसेनेचे खासदार संजय मंडलिक यांची ओळख आहे. त्यांनी खासदारकीच्या काळात जिल्ह्यातील अनेक प्रलंबित प्रश्न सोडविले असून त्यांनाच शिवसेनेची उमेदवारी द्या अशी मागणी जिल्ह्यातील मंडलिक प्रेमींच्या वतीने आमदार प्रकाश आबिटकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, कोल्हापूर जिल्ह्याच्या सामाजिक व राजकारणामध्ये स्वर्गीय खासदार सदाशिवराव मंडलिक यांचे योगदान मोठे आहे. स्वर्गीय मंडलिक यांना मानणारा मोठा वर्ग जिल्ह्यात आहे. ही स्वाभीमानी जनता खासदार संजय मंडलिक यांच्या मागे ठामपणे उभी असून त्यांना पुन्हा खासदार करण्यासाठी ही सर्व जनता कंबर कसून कामाला लागली आहे.

कोल्हापूर जिल्ह्याच्या समाजकारण, राजकारण सहकारामध्ये संजय मंडलिक यांची एक वेगळी ओळख आहे. जिल्ह्याच्या राजकारण सहकारामध्ये सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून संजय मंडलिक कार्यरत आहेत. त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे जिल्ह्याचा विकासाचा आलेख वेगाने वाढतो आहे. स्वर्गीय सदाशिवराव मंडलिक यांनी सर्वांना सोबत घेवून जिल्ह्याचा विकास केला असून



त्यांच्याकडे सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून कोल्हापूर जिल्हा पाहत होता. आता त्यांच्या नंतर खासदार मंडलिक यांचेकडूनही तीच अपेक्षा लोक व्यक्त करत आहेत. यासाठीच आगामी लोकसभा निवडणूकीत त्यांना शिवसेनेची उमेदवारी द्यावी.

# आरोग्य कार्यक्रमात कोल्हापूर महापालिका दुसऱ्या, सांगली तिसऱ्या क्रमांकावर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : आरोग्यविषयक कार्यक्रमांच्या रँकिंगमध्ये सांगली, मिरज, कुपवाड महापालिका राज्यात पहिल्या पाच क्रमांकांमध्ये आली आहे. जानेवारी महिन्यातील रँकिंग गुरुवारी (दि. ७) राज्याच्या आरोग्य विभागाने जाहीर केले.

पहिल्या क्रमांकावर पुणे महापालिका (३८.२१ गुण) आहे. दुसऱ्या क्रमांकावर कोल्हापूर (३७.४३), तिसऱ्या क्रमांकावर सांगली (३६.०९), चौथ्या क्रमांकावर नागपूर ( ३३.५०) आणि पाचव्या क्रमांकावर नवी मुंबई महापालिका (३३.११) आहे. राज्यातील सर्व महापालिकांमध्ये आरोग्यविषयक कार्यक्रम राबविण्याच्या गतीवरुन प्रत्येक महिन्याचा गुणानुक्रम काढला जातो.




जानेवारीच्या रँकिंगमध्ये कोल्हापूर, सांगली महापालिका अग्रेसर ठरल्या आहेत. शेवटच्या पाच क्रमांकांमध्ये वसई-विरार (२३.०१), धुळे (२१), छत्रपती संभाजीनगर (२०.८८), परभणी (२०.८८) आणि जळगाव १८.८३) या महापालिकांचा समावेश आहे. त्यांच्या कामात महत्वपूर्ण सुधारणा होणे गरजेचे असल्याचे राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त धीरजकुमार यांनी म्हटले आहे.

सर्व महापालिकांचे कार्यक्रमनिहाय गुण पाहिल्यास माता आरोग्य, बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, क्षयरोग निवारण, आयुष्मान भारत आदी कार्यक्रमांवर जास्त लक्ष देण्याची गरज असल्याचेही म्हटले आहे.

# पुणे-बेंगलुरू हरित महामार्ग योगेवाडी औद्योगिक वसाहतीला जोडणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**


सांगली : प्रस्तावित पुणे बेंगलुरू हरित महामार्ग जिल्ह्यातील तासगाव, विटा, कवठेमहांकाळ व मिरज तालुक्यांतून जात आहे. तो योगेवाडी (ता. तासगाव) औद्योगिक वसाहतीला जोडण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महामार्गाच्या माध्यमातून ही वसाहत वेगाने विकसित करण्याचे शासनाचे नियोजन आहे.

-ऊत्तएठढखडएचएछ्ढ

पुणे ते बेंगलूरूदरम्यान नवा हरित महामार्ग विकसित होत आहे. सध्याच्या पुणे-बेंगलुरू महामार्गासाठी तो पर्यायी असेल. या बहुचर्चित महामार्गाचा प्रकल्प अहवाल केंद्र सरकारला सादर झाला आहे. भारतमाला प्रकल्पातून हा महामार्ग प्रस्तावित आहे. त्यासाठी ४० हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. पुणे, कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यांतून त्याचा प्रवास होईल. सांगली जिल्ह्यात खानापूर, तासगाव, मिरज व कवठेमहांकाळ तालुक्यांतून जाईल. सध्याच्या पुणे-बेंगलुरू महामार्गापेक्षा तो लांबीला ९३ किलोमीटरने कमी आहे.

हा हरित महामार्ग योगेवाडी औद्योगिक वसाहतीला जोडण्याचे नियोजन आहे. यामुळे या भागाच्या विकासाला गती मिळण्याची अपेक्षा आहे. योगेवाडी वसाहतीपासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावरून नवा महामार्ग जातो. हे अंतर थेट महामार्गाने जोडल्यास उद्योगांना चालना मिळेल असा शासनाचा विचार आहे. वसाहतीचे काम येत्या काही दिवसांत सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा महामार्ग हायवे कॉरिडॉरला जोडण्याची मागणी होत होती.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्याबाबत सकारात्मक भूमिका घेत प्रशासनाला कार्यवाहीच्या सूचना देऊ, असे स्पष्ट केले आहे. योगेवाडी वसाहत महामार्गाने जोडली गेल्यास संपूर्ण तासगाव तालुक्याच्या



विकासालाच चालना मिळणार आहे. कृषी आधारित उद्योग येथे येऊ शकतील. सांगली, मिरज वसाहतीत सध्या मोठ्या प्रकल्पांसाठी पुरेशी जागा शिल्लक नाही. औद्योगिक विकासाचा हा केंद्रबिंदू महामार्गामुळे योगेवाडी वसाहतीकडे वळवता येऊ शकतो.

हरित महामार्ग खानापूर तालुक्यातील माहुली, वलखड, वेजेगाव, भेंडवडे, साळशिंगे, जोंधळखिंडी, माधळमुठी, वासुंबे, रेणावी, रेवणगाव, घोटी बुद्रुक आणि घोटी खुर्द या गावांतून जातो. तासगाव तालुक्यातील कचरेवाडी, नरसेवाडी, किंदरवाडी, विजयनगर, पेड, मोराळे, मांजर्डे, शिरगाव, हातनोली, बस्तवडे, सावळज, वज्रचौंडे, मणेराजुरी आणि गव्हाणमधून जातो. कवठेमहांकाळ तालुक्यात बोरगाव, मळणगाव, हरोली, देशिंग, बनेवाडी, शिंदेवाडी, कुकटोळी, रामपूरवाडी आणि कोगनोळीमध्ये येथून, तर मिरज तालुक्यातील सलगरे, बेळंकी आणि संतोषवाडी या गावांतून जातो. ही गावे थेट योगेवाडी वसाहतीला जोडली जातील.

७४५ किलोमीटर लांबीचा हा महामार्ग आठ मार्गिकांचा असून, पुणे-मुंबई द्रूतगती महामार्गापेक्षा रुंद म्हणजे १०० मीटर असेल. काँक्रीटऐवजी डांबरीकरण होणार असून, ताशी १२० किलोमीटर गतीने प्रवास करता येईल. पुण्यात वरवे बुद्रुकपासून प्रारंभ होऊन सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतून जाईल. योगेवाडी वसाहतीला जोडल्यानंतर ही वसाहत पुण्यातील उद्योगांशी थेट जोडली जाणार आहे.

# आम्हाला महापालिकेची नोकरी नको ; दहा जणांनी नोकरी नाकारली

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेत नोकरीसाठी निवड होऊनही अनेक तरुण रुजू होत नाहीत. तर दहा जणांनी चक्क अर्ज देत नोकरीच नाकारली असल्याचे समोर आले आहे. महापालिकेत लिपिक पदासाठी निवड होऊनही महापालिकेपेक्षा अन्य शासकीय विभागातील पदाच्या नोकरीला उमेदवारांनी प्राधान्य दिले आहे.

महापालिकेच्या लिपिक पदाच्या परीक्षेत १७७ जण उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी आत्तापर्यंत १२४ जणांनी महापालिकेची नोकरी स्वीकारली आहे. तर, १० जणांनी नोकरी नाकारली असून, ४३ जण अद्याप नोकरीवर रुजू झालेले नाहीत. त्यामुळे महापालिका प्रशासन विभाग अद्याप लिपिक पदावरील त्या ४३ उमेदवारांची रुजू होण्यासाठी वाट पाहात आहे.

महापालिकेच्या वतीने विविध १५ पदांसाठी एकूण ३८७ जागांसाठी मे २०२३ मध्ये परीक्षा घेण्यात आली. त्यात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची कागदपत्रे तपासण्याची प्रक्रिया करून अधिकारी, कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेत रुजू करून घेतले जात आहे. त्यांना प्रशिक्षणही देण्यात येत आहे. दरम्यान, या नोकर भरतीसाठी परीक्षा देणाऱ्या अनेक उमेदवारांनी शासनाच्या महसूलसह अन्य विभागाच्या पदांसाठी विविध परीक्षा दिल्या. महापालिकेच्या लिपिक पदासाठी उत्तीर्ण झालेल्या १७७ उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना रुजू करून घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, दरम्यानच्या काळात तलाठी भरतीसह इतर परीक्षांचाही निकाल जाहीर झाला. यामध्ये अनेक उमेदवार महापालिकेची लिपिक आणि तलाठी परीक्षेसह शासनाच्या इतर विभागातील परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे समोर आले. त्यामुळे निवड झालेल्या १७७ लिपिकांपैकी आत्तापर्यंत १२४ लिपिक महापालिका सेवेत रुजू झाले आहेत. तर, त्यातील १० तरुण-तरुणींनी ई-मेल व लेखी अर्जाद्वारे आम्हाला नोकरी नकोय, म्हणून महापालिका प्रशासनाला कळविले आहे. तर ४३ जण पात्र असून अद्याप नोकरीवर रुजू झालेले नाहीत. त्यामुळे उमेदवारांनी महापालिकेच्या लिपिक पदापेक्षा शासनाच्या अन्य नोकरीला प्राधान्य दिल्याचे दिसून येत आहे.

त्या उमेदवारांना महापालिकेकडून आणखी एक संधी दिली जाईल, अन्यथा वेटिंग लिस्टमधील पात्र केलेल्या उमेदवारांना त्या जागेवर संधी देण्यात येणार असल्याचे प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

# जागांपेक्षा भाजपचा पराभव हेच टार्गेट

## ‘आप’चे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्षांनी व्यक्त केलं स्पष्ट मत

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : आम आदमी पार्टी इंडिया आघाडीचा घटक असून लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतून 'आप'ला किती जागा मिळतील? यापेक्षा भाजपचा पराभव करणे हेच आमच्यासाठी जास्त महत्त्वाचे असल्याचे 'आप'चे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले. महाराष्ट्रात लोकसभेला



'आप'ला काही जागा मिळाव्यात अशी मागणी वरिष्ठांकडे केल्याचेही ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'आप'ची राज्यभर संघटन बांधणी सुरु असून फाटके यांनी शनिवारी कोल्हापुरात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. तत्पूर्वी, त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, आपच्याही महत्वकांक्षा आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत काही जागांची मागणी वरिष्ठांकडे केली असली तरी कोण किती जागा लढवतोय, कुणाला किती जागा हव्या आहेत यात आम्हाला रस नाही. त्यापेक्षा भाजपला पराभव करणे हेच आमचे उदिष्ठ आहे. यावेळी संदीप देसाई, उत्तम पाटील,अरुण कदम, अभिजित कांबळे, दुष्यंत माने, मोईन मोकाशी उपस्थित होते.

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून शाहू छत्रपती हे महाविकास आघाडीतून निवडणूक लढविणार आहेत. छत्रपती शाहू महाराजांचा विचार आपण सर्वांनी पुढे नेण्याची गरज आहे. त्यामुळे शाहू छत्रपती यांच्यापाठीमागे पूर्ण ताकतीनिशी 'आप' उभी राहिल, अशी ग्वाही फाटके यांनी दिली.

# लैंगिक हिंसाचार समस्यांवर महिलांना ‘दिलासा’ ; महापालिकेच्या सर्व प्रसूतिगृहात आता मिळणार सुविधा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई : लैंगिक हिंसाचाराला सामोरे जावे लागणाऱ्या महिलांना त्यांच्या घराजवळ वैद्यकीय त्याचप्रमाणे कायदेशीर सेवा पुरवता यावी, या दृष्टिकोनातून महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर नवीन उपक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे महानगरपालिका रुग्णालयांमध्ये असलेल्या 'दिलासा' केंद्रांचा आता महानगरपालिकेच्या सर्व प्रसूतिगृहांमध्ये 'दिशा' केंद्रांच्या स्वरुपात विस्तार करण्यात येणार आहे. एवढेच नव्हे तर लैंगिक व घरगुती हिंसाचाराविषयी आरोग्य आपल्या दारी योजनेतूनही जनजागृती करण्यात येणार आहे.

महिलांना लैंगिक हिंसाचार (जेंडर बेस्ड व्हायलन्स) घटनांना मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागते. त्यामुळे अशा प्रकारच्या घटनांमध्ये महिलांना तत्परतेने प्रतिसाद देण्यासह आवश्यक त्या मदतीचा विस्तार करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. इकबाल सिंह चहल यांनी निर्देश दिले होते.



महानगरपालिकेच्या १२ रुग्णालयांमध्ये सध्या कार्यरत असलेल्या 'दिलासा' केंद्रांचा विस्तार केला जाणार आहे. कौटुंबिक हिंसाचार हा महिलांवरील हिंसाचाराचा अत्यंत व्यापक प्रकार आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस)-५ मधील माहितीनुसार, नागरी भागांमध्ये २४ टक्के महिलांना जोडीदाराकडून हिंसाचार तसेच १८ ते ४९ वयोगटातील २.५ टक्के गर्भवती महिलांना शारीरिक हिंसाचाराचा सामना करावा लागला आहे. हिंसाचाराच्या अशा घटनांचा एकूण विचार करता ७७ टक्क्यांपेक्षा जास्त महिलांनी अशा घटना अथवा अनुभवांबद्दल थेट तक्रार करणे किंवा बोलणे टाळले आहे.

कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिलांच्या सहकार्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अनेक उपाय केले जात आहेत. लैंगिक हिंसाचाराने (जेंडर बेस्ड व्हायलन्स) पीडित महिलांसाठी महानगरपालिका रुग्णालयांमध्ये संकटकालीन हस्तक्षेप केंद्र (क्रायसिस इंटरव्हेन्शन सेंटर) स्वरूपातील १२ दिलासा केंद्रे आणि दोन वन स्टॉप केंद्रे कार्यरत आहेत. लैंगिक हिंसाचाराने पीडित संशयित महिलांना विविध ओपीडी मधून पाठवले जाते.

१५ हजारापेक्षा अधिक महिलांना मदत

गेल्या वर्षी २०२३ मध्ये, दिलासा केंद्रांमध्ये लैंगिक हिंसाचाराने पीडित १५ हजार ४०६ महिला आणि १ हजार २५१ मुलांची वार्षिक तपासणी आणि समुपदेशन करण्यात आले. तपासणी केल्यानंतर १ हजार ७०७ महिला तर ५३० बालकांची या केंद्रांवर लैंगिक हिंसाचार पीडित म्हणून नोंदणी करण्यात आली. या सर्वांना समुपदेशनासोबतच आवश्यकतेनुसार वैद्यकीय मदत तसेच कायदेशीर आणि पोलीस मदत पुरविण्यात आली.

महानगरपालिकेच्या प्रसूतिगृह केंद्रांमध्ये लैंगिक हिंसाचाराची प्राथमिक तपासणी आणि अन्य सेवा पुरविण्यासाठी ‘दिशा’ केंद्र सुरू केले जातील. सर्व केंद्रांमध्ये तपासणी, समुपदेशन आणि संदर्भ सेवा प्रदान करण्यासाठी परिचारिकांची क्षमता वृद्धी करण्यात येईल. त्याचप्रमाणे, ‘आरोग्य आपल्या दारी’ योजनेअंतर्गत तळागाळात काम करणारे आरोग्य कर्मचारी (आशा किंवा सामुदायिक आरोग्य स्वयंसेवक) लैंगिक किंवा घरगुती हिंसाचार आणि त्यावर उपलब्ध असलेल्या सेवांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करतील.